
दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, बुधवार, दि.१९ फेब्रुवारी २०२५
वर्ष : ०४, अंक : १८९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com









## 'जीबीएस'मुळे राज्यातील यात्रांवर निर्बंध

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, बुलडाणा :** देशात आणि महाराष्ट्र राज्यात जीबीएसचा वेगाने प्रसार होत असून त्याचा धोका वाढला आहे. हा आजार जर गर्दीमुळे आणि संसर्गजन्य असल्याचे स्पष्ट झाले तर आरोग्य यंत्रणा व प्रशासनाची बैठक घेऊन लवकरच राज्यातील यात्रांवर निर्बंध आणण्याबाबत विचार करू असे सुतोवाच देशाचे आरोग्य, आयुष आणि कुटुंब कल्याण राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी येथे केले.

नामदार प्रतापराव जाधव काल सोमवारी बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. या दरम्यान त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय मधील आपल्या संपर्क कार्यालयात प्रसिद्धि माध्यम प्रतिनिधि समवेत संवाद साधला. यावेळी जीबीएस च्या वाढत्या धोक्या संदर्भात विचारणा करण्यात आली असता त्यांनी वरील प्रमाणे सुतोवाच केले . देशात आणि महाराष्ट्र राज्यात



या आजाराचा, प्रसार आणि धोका वाढला असून रुग्ण संख्येत वाढ झाली आहे. या आजाराची लागन, गर्दी आणि संसर्ग मुळे होत असल्याचे आढळून आल्यास यात्रा वर निर्बंध संदर्भात नक्कीच विचार करू असे ते म्हणाले. केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांच्या मार्गदर्शनात केंद्रीय आरोग्य विभाग आणि यंत्रणा या आजाराचा सामना करण्यासाठी सज्ज आहे. महाराष्ट्र राज्यातील आरोग्य यंत्रणा देखील आजाराचा मुकाबला करण्यासाठी तयार असल्याचे केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री यावेळी म्हणाले. 'शिंदे गट भाजपात विलीन होईल' या शिवसेना (उबाठा) नेते खासदार संजय राऊत यांच्या भाकिताची त्यांनी खिल्ली उडविली. यासंदर्भात विचारणा केली असता नामदार जाधव म्हणाले की, संजय राऊत यांनी त्यांचा उबाठा गट सांभाळावा.

आज घडिला दररोज उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतील नेते व कार्यकर्ते आमच्यात (शिवसेना शिंदे गट मध्ये) सामील होत आहेत. त्यामुळे त्यांच्या पायाखालची वाळू सरकली व सरकत आहे. शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे जहाल हिंदुत्ववादी विचार पुढे नेण्यासाठी आणि त्याचा प्रसार, प्रचार करण्यासाठी आमचे नेते आणि राज्याचे उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पूर्णपणे सक्षम आहे.

राउत यांनी त्यांच्या शिवसेनेच बघाव, असा परखड़ सल्ला त्यानी यावेळी दिला. शेतकरी सोयाबीन आणि कापूस खरेदी संदर्भात विचारणा केली असता, एकाही शेतकऱ्याचा सोयाबीन आम्ही घरात ठेवणार नाही, अशी ग्वाही जाधव यांनी दिली. कापसाच्या भावाबद्दलही लवकरच मी कृषीमंत्र्यांना भेटून चर्चा करणार आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी धीर धरावा व खचून जाऊ नये, असा दिलासा त्यांनी दिला.

## थोडक्यात

### शीव परिसरात दोन लहान मुलींवर अत्याचार

मुंबई : शीव परिसरात सहा व आठ वर्षांच्या मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी २५ वर्षीय तरूणाविरोधात बलात्कार व बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित मुलींची शीव येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली. शीव परिसरात सोमवारी सायंकाळी ५ च्या सुमारास पीडित मुली खेळत होत्या. त्यावेळी आरोपी त्यांना एका वाहनामागे घेऊन गेला. त्यानंतर पीडित मुलींवर लैंगिक अत्याचार केला. त्यामुळे पीडित मुली घाबरल्या. त्यापैकी एका मुलीने हा प्रकार कुटुंबियांना सांगितला. त्यानंतर याप्रकरणी धारावी पोलिसांकडे तक्रार करण्यात आली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ६४, ६५ (२) व पोक्सो कायद्यातील कलम ४, ८, १२ अंतर्गत गुन्हा दाखल केला. आरोपी शीव परिसरातील एका कारखान्यात कामाला आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### प्रेम प्रकरणातून इंजिनिअरिंग तरुणीची आत्महत्या

**पिंपरी चिंचवड :** प्रेमसबंधातून होणाऱ्या मानसिक त्रासाला कंटाळून कॉम्प्युटर इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या तरुणीने १५ व्या मजल्यावरून उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. या प्रकरणी प्रियकर प्रणव डोंगरेला अटक करण्यात आली आहे. सहिता रेड्डी असं आत्महत्या केलेल्या तरुणीच नाव होतं. सहिता आणि प्रणव दोघे ही एकाच नामांकित कॉलेजमध्ये शिक्षण घेत होते. प्रणव हा सहिताच्या घरी नेहमी यायचा. पण पालकांना आपली मुलगी प्रेमप्रकरणात पडली आहे याबाबत पुसटशीही कल्पना नव्हती. हेच प्रेम सहिताचा काळ ठरलं. ५ जानेवारी रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास सहिताने राहत्या इमारतीच्या १५ व्या मजल्यावर जाऊन उढी घेत आत्महत्या केली.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते छ.शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, ठाणे :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात सर्वात जास्त सन्मान स्त्रियांना होता. आपले राज्य हे महिलांना सन्मान देणारे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातीतील लोकांना एकत्र घेऊन स्वराज्य निर्माण केले. राज्य करताना संविधान आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांनी प्रेरित होवून राज्य केले जाते, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

बदलापूर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा, आमदार किसन कथोरे, आमदार कुमार आयलानी, विधानपरिषद सदस्य निरंजन डावखरे, विधानपरिषद सदस्य ज्ञानेश्वर म्हात्रे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, मुख्याधिकारी मारुती गायकवाड व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बदलापूर सारख्या ऐतिहासिक शहरात शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण करण्याची संधी मिळणे, ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. आपण सर्वजण जाणता की, आज आपण जो स्वातंत्र्याचा श्वास घेत आहोत, जगतो आहोत, आज आपला स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा ही जिवंत आहे याचे एकमेव कारण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज, ज्यांच्यामुळे हे स्वातंत्र्य आपल्याला मिळाले आहे. ज्या काळामध्ये अनेक राजे मुघलांचे मांडलिकत्व स्वीकारत होते.

स्वातंत्र्याची इच्छा सोडून दिली होती, गुलामीत राहणे पसंत करत होते, अशा काळामध्ये आई जिजाऊंनी छत्रपती शिवरायांना शिकवण दिली आणि संकल्प दिला की शिवबा तुला देव, देश आणि धर्मासाठी लढायचे आहे. कितीही मनसबदारी मिळाली, सरदारी मिळाली तरी परकीय आक्रमकांचा नोकर म्हणून आपल्याला काम करायचे नाही तर आपल्या सामान्य माणसावर ओढवलेले हे जे संकट आहे ते दूर सारून या मराठी मुलुखाला स्वराज्यामध्ये परिवर्तित करावेच लागेल.



ते पुढे म्हणाले की, एकीकडे मुघलांच्या फौजेमध्ये इराणी, अफगाणी, उज्बेकिस्तान, बलुचिस्तान या सगळ्या भागातले मोठमोठे सरदार होते, त्यांना मोठमोठा पगार होता. ते पगारी नोकरदार होते, लढणे हा त्यांचा व्यवसाय होता. मोठा प्रशिक्षण आणि पैसा त्यांच्या पाठीशी होता. पण आपले मावळे मात्र अर्धपोटी राहून लढायचे. पण फरक काय होता, तर मुघलांचे सैन्य हे पगारार्थ लढायचे आणि आपले मावळे देव, देश आणि धर्मासाठी लढायचे. त्यांना माहिती होतं, ज्या राजाकरता आपण लढतोय तो स्वतःसाठी लढत नसून आपल्या जनतेला मुघलांच्या जाचातून बाहेर काढण्यासाठी लढतो आहे. त्यामुळे लाखाची फौज घेऊन मोघल आक्रमक यायचे आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे ५ हजार मावळे त्या फौजेला नामशेष करायचे. याचे कारण त्यांच्यामध्ये जी क्रांती, जे तेज छत्रपती शिवरायांनी पेरलं होतं त्यामुळेच खऱ्या अर्थाने ही लढाई ते जिंकू शकायचे.

छत्रपती शिवाजी महाराज केवळ एक चांगले योद्धे म्हणूनच मर्यादित नसून ते एक उत्तम प्रशासक देखील होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेले पाण्याचे नियोजन, जंगलांचे नियोजन, बांधलेले किल्ले आणि तयार केलेले आरमार यातील प्रत्येक गोष्ट जर आपण बघितली तर कोणाकडून कर घ्यायचा व कोणाकडून घेऊ नये, कशा पद्धतीत कर घ्यायचा आणि कशा पद्धतीत घेऊ नये, ही प्रत्येक गोष्ट छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या आज्ञावलीच्या माध्यमातून लिहून ठेवली आणि कार्यान्वित केली, असे सांगितले.

## पुणे विमानतळाच्या मानांकनात वाढ, तरी असुविधा कायम

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, पुणे :** भारतीय विमानतळ प्राधिकरण आणि जागतिक विमानतळ सेवा गुणवत्ता (एसक्यू) सर्वेक्षण अहवालानुसार पुणे विमानतळाचे स्थान उंचावले आहे. विमानतळाने ७४ व्या स्थानावरून ६७ व्या स्थानी झेप घेतली आहे. मात्र, विमानतळावरील असुविधांबाबत प्रवाशांच्या तक्रारी कायम असल्याने सेवासुविधांच्या बाबतीत घसरण होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.




पुणे विमानतळाचा नव्या टर्मिनलमुळे विस्तार झाला आहे. त्यामुळे विमान उड्डाण संख्येत वाढ झाली आहे. देशभरातील अनेक महत्त्वाच्या शहरांशी, तसेच परदेशातील काही शहरांशी पुणे जोडले आहे. विमान प्रवाशांची संख्या वाढत असताना विमानतळावर सेवासुविधा पुरवणे महत्त्वाचे आहे. विमानतळ सेवा गुणवत्ता सर्वेक्षणात विमानतळावरील सेवासुविधांचे मूल्यमापन करण्यात येते. त्यानुसार गेल्या तिमाहीत पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सेवा गुणवत्तेत सुधारणा झाली, तर २०२४ च्या चौथ्या तिमाहीत (ऑक्टोबर ते डिसेंबर) सेवा गुणवत्ता ४.८४ टक्क्यांवरून ४.९१ टक्के झाली.

त्यापूर्वी जुलै ते सप्टेंबर या तिमाहीच्या तुलनेत सुधारणा झाली. स्वच्छता, प्रवाशांसाठीचा प्रतीक्षा कालावधी, वाहनतळ, सुरक्षितता अशा घटकांसह इतर ३१ मानांकन निकषांच्या आधारावर पुणे विमानतळाने स्थान उंचावले. मात्र, सात महत्त्वाच्या मानांकनामध्ये पुणे विमानतळाची घसरण झाल्याचे दिसून आले आहे. त्यात प्रवाशांचा विमानतळावर प्रवेश करताना लागणारा कालावधी, तपासणी (स्क्रीनिंग) प्रक्रियेतील मंद गती, मदत, व्यावसायिक धोरणांची अंमलबजावणी, स्वच्छतागृहे, महिला प्रवाशांसाठीच्या सुविधा यांचा समावेश आहे.

सेवा गुणवत्तेच्या मानांकनात गेल्या तिमाहीपेक्षा सुधारणा होऊन ६७वे स्थान मिळाले आहे. विस्तारीकरणाच्या दृष्टीने काही सुविधा राहिल्या असतील, मात्र जागतिक मानांकनात पुणे विमानतळाची कामगिरी सुधारत आहे. प्रवाशांच्या व्यक्तिगत अनुभवानुसार काही तक्रारी असू शकतात. मात्र, गेल्या सहा महिन्यांत विमानतळावर अनेक सुविधा सुधारण्यात आल्या आहेत. प्रवाशांसाठीच्या सुविधांच्या गुणवत्तेत अधिक वाढ करण्याबाबत काम सुरू आहे. येत्या काळात सेवा-सुविधांमध्ये नक्कीच वाढ होईल. – **संतोष ढोके, संचालक, पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ**

## संपादकीय



### शिवजयंती...

महाभाग्यवान मी महाराष्ट्र माझी मायभूमी महाराजांचीच ही महतकरणी! शुक्रवारचा दिवस होता, रात्रीची वेळ होती. अवध्या शिवनेरीच्या मुखावर औत्सुक्य, आनंद अन् काळजी झळकत होती. साऱ्या गडाचे लक्ष लागले होते. ते जिजाऊंकडे. शिवनेरीत बांधलेला पाळणा मोठ्या प्रतिक्षेत होता. क्षणातच आनंद उधळीत एक बातमी चोही दिशेला वाऱ्यासारखी पसरली. पुत्ररत्न झाला पुत्ररत्न झाला! गडावरील सारं वातावरण ढवळून निघालं होतं. गडावर सर्वत्र नगारे-चौघडे वाजू लागले होते. चोहीकडून एकच वार्ता कानावर पडत होती. जिजाऊंच्या उदरी पुत्ररत्न झाला... अर्थातच शिवबाचा जन्म झाला अन् जणू काय भारतमातेच्या रक्षणार्थ हिंदवी स्वराज्याचा क्रांतीसूर्यच उदयास आला. ह्या शुभ बातमीच्या प्रित्यर्थ रयतेचं तोंड गोड करण्यासाठी सर्वत्र साखरेचं वाटप झालं. लोकांच्या चेहऱ्यावर आनंदाची झलक ठळकपणे दिसत होती. माँसाहेब जिजाऊंच्या मुखावर सोन्यावानी चमक झळकत होती. खरंतर त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. त्यांना आकाशही ठेंगणं वाटत होतं. तो भाग्यवान दिवस म्हणजे १९ फेब्रुवारी. चला तर, शिवजयंतीनिमित्त आपण सर्वधर्मीय लोक शिवछत्रपतींच्या शौर्यगाथेला त्रिवार मानाचा मुजरा करूया अन् त्याबरोबरच शिवजयंती मोठ्या हर्षोल्हासात साजरी करूया! बोला छत्रपती शिवाजी महाराजांचा विजय असो! जय भवानी, जय शिवछत्रपती।

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कल्याण नगरीला महाराजांनी भारतातल्या पहिल्या आरमाराची स्थापना करण्याचा मान दिला. शत्रु पक्षाला गाफील ठेऊन गनिमी काव्याच्या युद्धतंत्राद्वारे शिवबाचे सैनिक कल्याण खाडीतून आपल्या आरमाराद्वारे हल्ले करायचे. केवळ भारतातल्या अंतर्गत शत्रूनाच नव्हे तर, डच, पोर्तुगाल, इंग्रज, मोगल आदींना सुद्धा शिवछत्रपतींच्या आरमार यंत्रणेने जेरीस आणले होते. हिंदुस्थानाच्या इतिहासात सागरी बळाची उपयुक्तता व ताकद ओळखली ती शिवरायांनी. त्यांनी भारतीय आरमाराची या देशात सर्वप्रथम उभारणी केली. त्यामुळे शिवछत्रपतींना हिंदुस्थानी आरमाराचे (इंडियन नेव्ही) आद्यप्रणेते म्हणतात. महाराजांच्या जंगी बेड्यात सुमारे ७४ गलबते होती. अर्थातच शिवकालीन काळात महाराजांच्या आरमार दलाचा सर्वदूर दबदबा होता. दरम्यान दिपावलीच्या शुभमुहूर्तावर महणजेच २४ ऑक्टोबर १६५७ रोजी शिवरायांनी कल्याणला स्वतंत्र करून दुर्गाडीवर आपल्या हिंदुत्वाचा भगवा फडकवला. मराठी स्वराज्याची मुहूर्तमेढ कल्याणहून करत शिवरायांनी पुढे युद्धकौशल्याच्या बळावर सलग ४० किल्ले सर केलेत. राष्ट्रभक्तीसह हिंदुत्वाची भावना रयतेच्या मनात बिंबविण्याच्या दृष्टिकोनातून शिवबाने जिजाऊंच्या संकल्पनेतून दुर्गाडी किल्लयावर भवानी देवीची प्रतिष्ठापना केली. यास्तव आम्ही कल्याणकर माँसाहेब जिजाऊ अन् शिवरायांचे ऋणाईत होऊन त्यांना त्रिवार नमन करतो.

मित्रहो, १६७४ साल उजाडलं अन् मराठी राज्याच्या इतिहासात एक नवं पर्व सुरू झालं. दरम्यानच्या काळात शिवराज्याभिषेकसंदर्भात स्वकियांनी आणि परक्यांनी अनेक वेळा अडथळे आणलेत, त्यामुळे जिजामाता अत्यंत व्यथित झाल्या होत्या. त्या नेहमी शिवबाच्या राज्याभिषेकबाबत चिंतित असायच्या, शेवटी जिजामातांच्या अथक प्रयत्नांना यश आलं. काशीच्या गागाभट्टांना शिवबाच्या राज्याभिषेकचं पौरोहित्य सोपविण्यात आलं. या कारणास्तव रायगड नटूनथटून उभा होता. जिजाऊंच्या आनंदाला पारावारच उरला नव्हता. हा अभूतपूर्व सोहळा पाहण्यासाठी रायगडावर मोठी गर्दी उसळली होती. रायगडाच्या प्रवेशद्वारावर देशी व परदेशी पाहुण्यांच्या स्वागतासाठी खरेखुरे गजराज उभे ठाकले होते. ६ जून १६७४ रोजी पहाटे पाचच्या सुमारास शिवबाचा राज्यारोहण सोहळा संपन्न झाला. तोफांच्या सलामीनं अन् तुतारीच्या निनादात किल्ले रायगडावरील वातावरण ढवळून निघालं होतं. याप्रसंगी शिवरायांच्या नावाचा सर्वत्र जयघोष होत होता. गुलालाची उधळण होऊन किल्लयाचा सारा परिसर भगवामय होऊन आनंदाने बहरून गेला होता. राज्याभिषेक झाल्यावर शिवाजी महाराजांच्या नावापुढे छत्रपती अश्या एका अर्थानं नामकरण झालं. जिजाऊंच्या डोळ्यांचे पारणं फिटलं. जीवनाचं अखेरचं स्वप्न साकार झाल्याने त्यांच्या चेहऱ्यावरील काळजी जणू एकाएक नाहीशी झाली होती. त्या तृप्त झाल्या. त्या धन्य झाल्या. त्यांना ह्याची देही ह्याची डोळा शिवबाचा राज्याभिषेक पहावयास मिळाला.राज्याभिषेक झाल्यानंतर शिवबा हे सिंहासनावर विराजमान झाले. त्या आधी त्यांनी गागाभट्ट आणि जिजाऊ मातेचे चरणस्पर्श करून आशिर्वाद घेतले. जिजाऊ ह्या शिवछत्रपतीची दृष्ट काढत म्हणाल्या, शिवबा तुम्ही राजा झालात, रयतेचे राजा झालात. महत्त्वाचे म्हणजे तुम्ही छत्रपती झालात. आता तुम्ही आदर्श राजा होऊन पृथ्वीवर किर्तीमान व्हा. शिवबाचा राज्याभिषेक व्हावा, यासाठी जिजाऊंनी आपला जीव जणू मुठीत घट्ट धरून ठेवला होता. कारण हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी शिवबाला छत्रपती केल्यावर अवघ्या आठवड्यातच त्यांना देवाज्ञा झाली. धन्य त्या जिजाऊ माँसाहेब आम्ही मराठी भूमिपुत्र वंदनीय जिजाऊ माँसाहेबांना त्रिवार मानाचा मुजरा करतो.

# शिवराय आणि त्यांची सायकॉलॉजी



फेब्रुवारी महिना म्हटलं की वेगवेगळे 'डेज' डोळ्यासमोर येतात. पाश्चात्य संस्कृतीतून वाऱ्याच्या वेगाने पसरलेला हा प्रेमी युगलांचा सप्ताह ट्रेंड मध्ये असतो. रोज डे पासून ते व्हॅलेंटाईन डे पर्यंतचा हा प्रवास तरुणाई विशेष एन्जॉय करीत असते. त्यातही सोशल मीडियाच्या विश्वात तर याचा मोठा प्रभाव दिसून येतो. परंतु असे असले तरी या महिन्यातील एक दिवस ज्याची प्रत्येकजण अतिशय आतुरतेने वाट पाहत असतो आणि तो म्हणजे १९ फेब्रुवारी. स्वराज्यनिर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मदिन. मनातील स्वाभिमान जागा करून अभिमानाने जगण्याची प्रेरणा मराठीजनांना सर्वप्रथम कोणी दिली असेल तर ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांनी. आणि म्हणूनच साडेचारशे वर्षांनंतरही हा छत्रपती विचार तसाच अबाधित आहे. किंबहुना सरत्या वर्षाप्रमाणे तो अधिक गडद, अधिक प्रभावी होत चालला आहे

शिवरायांच्या आयुष्यावर आधारित असणारे शिवचरित्र आज एखाद्या ग्रंथाप्रमाणे मार्गदर्शक आणि प्रेरक ठरत आहे. या शिवचरित्रातून अनेक धडे आपल्याला दिशादर्शक ठरत असतात. यात महाराजांचे मॅनेजमेंट कौशल्य, त्यांची लीडरशिप अशा अनेक पैलूंवर आपण ऐकले, वाचले आहे. मात्र यातील अजून एक महत्वपूर्ण गोष्ट ज्यामुळे महाराजांची प्रतिभा अधिक प्रभावी ठरते. आणि ती म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांची सायकॉलॉजी अर्थात मानसशास्त्र. मानसशास्त्रात मानवाच्या वर्तनाचा,मानसिक प्रक्रियेचा अभ्यास केला जातो . सामान्यतः शास्त्रात मानसशास्त्रीय दृष्टिकोनाचा अधिक व्यापक अभ्यास केला जातो. परंतु युद्धशास्त्रात सायकॉलॉजिकल घटना समजून घेऊन त्याचा प्रभावी वापर करण्याचे कार्य ज्या मोजक्याच योद्धयांना जमले त्यातील अग्रभागी असणारे नाव म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. आपल्याला होणाऱ्या अन्यायाविरुद्ध पेटून उठायचे असेल ती आंतरिक ठिणगी किंबहुना ती मानसिकता निर्माण होणे गरजेचे असते. गुलामीतून स्वातंत्र्याकडे वाटचाल करण्यासाठी देखील हीच मानसिकता उफाळून यावी लागते. यासाठी वैयक्तिक एखाद्याच्या मनात ही भावना येऊन अपेक्षित इप्सित साध्य करता येत नाही. यासाठी गरज असते ती एका कुशल नेतृत्वाची. लाखों मनांवर अधिराज्य गाजविणाऱ्या राजासम व्यक्तिमत्वाची. आणि असे व्यक्तिमत्व म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव नक्कीच आदराने घेता येईल. मुघलांच्या जुलुमी राजवटीत खितपत पडलेल्या सर्वसामान्य मराठीजनांच्या मनात स्वराज्याची संकल्पना रुजवणे त्या काळात तेवढे सोपे नव्हते. आजकालसारखी सोशलमीडिया किंवा डिजिटलायझेशनची क्रांती तेव्हा झालेली नव्हती. तसेच दळण वळणासाठी लागणारी साधनेसुद्धा उपलब्ध नव्हती. अशा परिस्थितीत शिवरायांनी रायरेश्वरावर घेतलेली शपथ अवघ्या हिंदुस्थानातील हिंदुजनांच्या नसानसात भिनली. अशी भिनली की जीव गेला तरी बेहत्तर पण स्वराज्य स्वप्न प्रत्यक्षात आणायचेच. ही मानसिकता निर्माण करणे म्हणजे काय ? हीच ती सायकॉलॉजी जी महाराजांनी समजून घेतली आणि त्याचा योग्य वापर केला. रयतेच्या मनामनांवर राज्य करणारा राजा म्हणून शिवाजी महाराज ही ओळख झाली ती महाराजांमधील एका उत्तम सायकॉलॉजिस्टमुळे.

शिवचरित्रातील मैलाचा दगड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रतापगडाच्या युद्धातून याचा चांगलाच उलगडा होतो. त्याकाळात अफजल खानाने शिवाजी महाराजांचा पराभव करण्याचा विडा उचलला होता. प्रचंड सैन्य,फौजफाटा आणि शस्त्रे घेऊन खान चालून येत होता. वाटेत येणारी गावच्या गावे उध्वस्त करत स्वतःचे वर्चस्व निर्माण करीत होता. त्याच्या या हाहाकाराला थोपविणे शक्य नव्हते. मात्र हे सर्व पाहूनदेखील शिवाजी महाराज शांत होते. त्यांनी त्याला विरोध केला नाही. विरोध न करणे हा देखील महाराजांच्या मानसशास्त्रीय दृष्टिकोनाचाच एक भाग होता. कारण जेव्हा प्रतिस्पर्धी प्रत्युत्तर देत नाही तेव्हा तो घाबरलेला असतो ही सर्वसामान्य मानसिकता खानाच्या मनात पेरण्याचा हा एक उत्तम प्रयत्न होता. आणि तो प्रयत्न सफल झाला. महाराजांना कमी लेखण्याची चूक अफजलखानाने केलीच.

या युद्धातील दुसरा पैलू म्हणजे मैदानी प्रदेशात एवढ्या बलाढ्य मुघल सैन्याला सामोरे जाणे सोपे नव्हते. परंतु माघार घेतल्याचे दाखवत डोंगरदऱ्यात बोलवून त्याला नामोहरम करणे शक्य होते हे महाराजांनी हेरले. आणि पत्र पाठवून घाबरल्याचे दर्शवित अफजल खानाला प्रतापगडावर भेटण्यास बोलविले. महाराजांच्या या सायकॉलॉजिकल जाळ्यात फसून अतिआत्मविश्वासाने १० नोव्हेंबर १६५९ रोजी अफजल खान भेटीसाठी प्रतापगडावर आला. आता तिसरी आणि महत्वाची सायकॉलॉजिकल खेळी म्हणजे भेटीसाठी एका सुनियोजित जागेवर एक शामियाना उभारला गेला. त्या शामियानाला झुंबर,झालरी, सोन्याची आभूषणे लावून अधिक आकर्षक केले. एका तंबूत भेट होणार या इराद्याने आलेला अफजल खान त्या शामियान्यातील सौंदर्य पाहण्यात हरखून गेला. आता महाराज आपल्याला सहजासहजी शरण येणार आणि आपण त्यांचा पराभव करणार याची खानाला खात्री पटली. खानाची ही खात्री हा देखील महाराजांच्या सायकॉलॉजिकल योजनेचाच एक भाग होता. पुढे खानाला मुद्दाम उशिरा भेटायला जाऊन खानाने केलेल्या दगा -फटक्यापासून ते खानाचा कोथळा बाहेर काढेपर्यंत महाराजांनी केलेली कृती प्रशंसनीय होती. शेवटच्या क्षणाला शत्रूचे मन भरकटविणे, त्याला त्याच्या अंतिम उद्देशापासून दूर नेणे आणि दगाफटका गृहीत धरून त्याप्रमाणे नियोजन करणे. हे सर्व काय होते ? हाच होता छत्रपती शिवरायांच्या परफेक्ट सायकॉलॉजिस्ट विचारांचा परिपाक.

त्याचप्रमाणे आग्र्याहून सुटका, गनिमी कावा, तह करणे आणि स्वराज्यात एकेक करत किल्ले जोडणे अशा कित्येक गोष्टीत महाराजांचा मानसशात्रीय दृष्टिकोन दिसून येतो. महाराजांच्या यशात त्यांचे धैर्य, शौर्य,नेतृत्व,नियोजन आणि उत्तम मानसशास्त्रीय कौशल्य याचा मोलाचा वाटा होता. त्यातही १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात समाजमान्य झालेल्या सायकोलॉजी सारख्या संकल्पनेचा सोळाव्या शतकातच प्रत्यक्ष वापर करण्याचे कसब महाराजांना जमले हे अभिमानास्पदच. आणि म्हणूनच भारतवर्षातील एक उत्तम दूरदृष्टी असणारे नेतृत्व म्हणून आजही महाराजांचे नाव आदराने घेतले जाते. शिवरायांना आणि त्यांच्या कर्तृत्वाला मानाचा मुजरा.

**तमाम देशवासियांना श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा !**

**- सागर ननावरे**
**स्तंभलेखक, पुणे**

# पीर हजरत हुसैनी उर्सानिमित्त गुरूवारी महिलांचे भव्य आरोग्य शिबीर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१८, पाटण :** हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतिक व श्रध्दास्थान असलेल्या पाटण येथील पीर हजरत ख्वाजा सय्यद शाह कबुलुल्ला हुसैनी यांचा उर्स गुरूवार दि. २० व शुक्रवार दि. २१ रोजी होत आहे. यानिमित्ताने खानका हजरत ख्वाजा गरीब नवाज बंदानवाज गेसुदराज, प्राथमिक आरोग्य केंद्र मोरगिरी यांच्या सहकार्याने व पीर हजरत शेख मोहम्मद खलील चिश्ती यांच्यावतीने गुरूवार दि. २० रोजी सकाळी १० वाजता पुनेवाले शिस्ती हाउस रामापूर (पाटण) येथे महिलांसाठी आरोग्य मार्गदर्शन शिबीर व मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केले आहे. तर शुक्रवार दि. २१ रोजी महाप्रसादाचे आयोजन केले आहे. याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पीर हजरत शेख मोहम्मद खलील चिश्ती यांनी केले आहे.



महिलांच्या या आरोग्य शिबिरास माऊली हॉस्पीटल कराडच्या स्त्रीरोग तज्ञ डॉ. संगीता यादव, मोरगिरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य अधिकारी नागेश्वर ननावरे हे उपस्थित राहून महिलांना आरोग्यविषयी सखोल मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी भूमाता ब्रिगेड फौंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा, सामाजिक कार्यकर्त्या सौ. तृप्ती देसाई यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या शिबिरात महिलांची मोफत आरोग्य तपासणी, मोफत औषध उपचार, तक्रार निवारण व सल्ला, महिलांशी खुला संवाद व चर्चा, मोफत हिमोग्लोबिन, बीपी, शुगर तपासणी करण्यात येणार आहे.

शिबीर गुरुवार दि. २० फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत असणार आहे. तर शुक्रवार दि. २१ रोजी महाप्रसादाचे आयोजन केले आहे. शिबीराचे ठिकाण सातारा जिल्हा बँक रामापूर मागे, जि. प. शाळा रामापूर शेजारी, रामापूर पाटण येथे होणार आहे. या शिबिराचा लाभ जास्तीत जास्त महिलांनी घ्यावा, असे आवाहन पीर हजरत शेख मोहम्मद खलील चिश्ती (पुणेवाले) यांनी केले आहे.

## शिवजन्मोत्सव...

शिवरत्न जन्मे कूस
आऊ स्वप्नांची पुर्ती
मराठीराज्याची नांदी
दिल्लीपल्याड किर्ती

कसा आनंद सोहळा
पोवाडे कौतुक गाती
अवर्णनीय वर्णन ते
सुवर्ण शिवनेरी माती

काळोख भयानेग्रस्त
अशी शिवराय दिप्ती
सिंहासना येई शोभा
विराजता ते छत्रपती

बाळकडू अमृता सम
शिक्षण सक्षम संगती
आऊच्यामुशीत सार्थ
अग्नीशिखाधगधगती

सवाष्णीच्यापंचारती
आदर कळे नारीप्रति
जयकार आसमंतात
उचंबळली शिवप्रिती

शिवा आशीष देण्या
अंबर झुकले खालती
धन्य शिवनेरी किल्ला
दगड कपारी बोलती

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# शिवरायांचे महिला विषयक धोरण आणि आजची स्थिती

**रांझ्याच्या पाटलाने बलात्कार केल्याचे समजताच त्याचे हातपाय तोडून चौरंग केला. आज मात्र माता भगिनींची अब्रू लुटणारे हजारो नराधम न्यायालयाच्या छत्राखाली स्वतःला वाचवण्यासाठी धडपडत आहेत ! म्हणून आजही शिवरायांच्या स्वराज्याची छाप प्रत्येकाच्या श्वासाश्वासात आहे.**

चार वर्षांपूर्वी हिंगणघाट येथे एकतर्फी प्रेमातून प्राध्यापिका असलेल्या तरुणीला एका नराधमाने जिवंत जाळल्याची घटना असो की कोपर्डीच्या बहिणीची झालेली निर्घृण हत्या असो की अगदी काल परवा बदलापुरात झालेला चिमुरडी वरील अत्याचार !

या सर्व घटनांनी संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला होता. केवळ याच घटना नाही तर यासारख्या अनेक घटना रोजच या पावन भूमीत घडत आहेत. महिलांच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली जात आहे. आज या पावन भूमीत कोणतीच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. नराधमांना कायद्याचा धाक नाही. नराधमांना अटक होते त्यांना फाशीची शिक्षा व्हावी म्हणून जनतेतून उठाव होतो. मोर्चे निघतात. अनेक वर्ष न्यायालयात खटला चालतो. या नराधमांना फाशी होईल अशी अपेक्षा असताना त्यांना जन्मठेपेची शिक्षा होते आणि ही शिक्षाही रद्द व्हावी यासाठी हे नराधम वरच्या न्यायालयात अपील करतात. दररोजचे वर्तमानपत्र चाळलं तर त्यात विनयभंग, छेडछाड, बलात्काराची एकतरी बातमी दिसतेच. आजूबाजूला घडणाऱ्या महिलांविरोधी गुन्ह्यांच्या घटना पाहिल्या की शिवरायांच्या विचारांची, शिवरायांच्या धोरणाची कधी नव्हे इतकी गरज आज असल्याचे जाणवते. कारण शिवरायांच्या शिवशाहित महिला जितक्या सुरक्षित होत्या तितक्या त्या कोणत्याच काळात नव्हत्या. कारण शिवरायांचे महिला विषयक धोरण. मध्ययुगीन काळात शिवरायांचा जन्म झाला. या काळात महाराष्ट्र परकीयांच्या गुलामगिरीत होता. शिवरायांनी महाराष्ट्राला परकीयांच्या गुलामगिरीतून मुक्त करून हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचा संकल्प केला. मराठी माणसांच्या मनात अस्मिता निर्माण केली. अठरापगड जातींना एकत्र करून त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. यात सर्वात मोठे कार्य म्हणजे महिलांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी केलेल्या सुधारणा, नियम आणि उचललेले कठोर पावले. त्यांचे हे पाऊल म्हणजे महिला मुक्तीसाठी केलेली क्रांतीच होती.

हजारो वर्षांपासून चालू असलेल्या अनिष्ठ चालीरीती बदलण्याची धमक कोणत्याच राजाने दाखवली नाही, ती धमक शिवरायांनी दाखवली. त्यांनी स्वतःच्या आईला सती जाण्यापासून परावृत्त केले ही त्याकाळातील सामाजिक क्रांतीच होती. त्याकाळी महिलांना गुलामीची वागणूक दिली जात होती. महिलांची खरेदी - विक्री केली जात होती. महिलांना गुलाम म्हणून वागवले जात होते. शिवरायांनी या सर्व गोष्टींवर बंदी आणली. शिवरायांचे महिलाविषयक धोरण अत्यंत आदराचे होते. जिजामाता या शिवरायांच्या गुरू होत्या. जिजामातेनेच त्यांना स्त्री जातीच्या सन्मानाचे बाळकडू पाजले म्हणूनच पर स्त्री मातेसमान मानणारा व शत्रूच्या स्त्रियांना सन्मान देणारा युगपुरुष म्हणून शिवरायांची इतिहासात नोंद झाली. शिवराय खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. रक्षणकर्ते होते. सैन्याला राजांचे सक्त आदेश होते. स्त्रियांना मोहिमेवर आणू नये, त्यांना युद्धात पकडू नये. स्त्री संबंधी गुन्ह्याला क्षमा नव्हतीच उलट कठोर शिक्षा होती, मग तो कोणीही असो. साधा शिपाई, वतनदार, किल्लेदार, कुणालाही माफी नव्हती. हातपाय तोडणे, देहदंड अशा कठोर शिक्षा दिल्या जात.

रांझ्याच्या पाटलाने गरीब शेतकऱ्याच्या तरुण मुलीला उचलून नेऊन भोगली. त्या तरुण मुलीने आत्महत्या केली. जेंव्हा ही गोष्ट शिवरायांना समजली तेंव्हा शिवरायांनी त्याच्या मुसक्या बांधून त्याला पुण्याला आणले. त्याचे हातपाय तोडण्याची शिक्षा दिली. जी गोष्ट रांझ्याच्या पाटलाची तीच गोष्ट कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची. तीच गोष्ट सकूजी गायकवाड या सेनापतीची. महिलांसबंधी गुन्ह्याला त्यांच्याकडे क्षमा नव्हती उलट कडक शिक्षाच होती. शिवरायांच्या या महिलाविषयक धोरणामुळेच महिला सुरक्षित होत्या. आजची परिस्थिती मात्र पूर्ण भिन्न आहे. महिला अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. महिलांना सुरक्षा पुरवण्यात सरकार अपयशी ठरत आहे. कायदे असूनही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरला नाही. राज्यकर्त्यांनी शिवरायांच्या महिलाविषयक धोरणांचा अभ्यास करुन ते राबवण्याचा प्रयत्न केल्यास देशात शिवशाही अवतरल्याशिवाय राहणार नाही.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पालकमंत्री सरनाईक १९ व २० फेब्रुवारी रोजी धाराशिव जिल्ह्यात



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१८, धाराशिव :** फेब्रुवारी परिवहन मंत्री तथा प्रताप सरनाईक हे १९ व २० फेब्रुवारी रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे. सायंकाळी ५ वाजता सोलापूर बस आगार येथून एसटीने धाराशिवकडे प्रयाण. सायंकाळी ६ वाजता धाराशिव येथे आगमन व मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव कार्यक्रमाला उपस्थिती. सायंकाळी ७ वाजता धाराशिव येथून मोटारीने कळंबकडे प्रयाण.सायंकाळी ७.४० वाजता कळंब येथे आगमन व कळंब येथील स्वागत समारंभास उपस्थिती. रात्री ८ वाजता कळंब येथील शिवछत्रपती प्रतिष्ठानतर्फे आयोजित शिवजयंती कार्यक्रमाला उपस्थिती.शिवसेना तालीम संघ शिवजयंती उत्सवात उपस्थिती.रात्री ८.४५ वाजता बस आगार कळंबची पाहणी करून रात्री ९ वाजता सोलापूरकडे प्रयाण व मुक्काम करतील.

२० फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता सोलापूर येथून तुळजापूरकडे प्रयाण ८:४५ वाजता तुळजापूर येथे आगमन,सकाळी ८.४५ ते सकाळी ९.४५ वाजता दरम्यान आई तुळजाभवानी मातेचे कुटुंबासमवेत दर्शन व महापूजा.सकाळी ९.४५ ते १० वाजता आई तुळजाभवानी मंदिरामधील गाभाऱ्यातील दगडांना तडे गेल्या संदर्भात पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत पाहणी व चर्चा. सकाळी १० वाजता श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान अंतर्गत श्री तुळजाभवानी सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलची १२४ भक्त निवासस्थान, तुळजापूर येथे पाहणी व सकाळी १०.१५ वाजता राणी लक्ष्मीबाई उद्यान सुशोभीकरण लोकार्पण सोहळ्याला उपस्थित राहून सकाळी १०.३० वाजता तुळजापूर येथून शासकीय मोटारीने धाराशिवकडे प्रयाण करतील. सकाळी १०.५० वाजता धाराशिव येथे आगमन व व्हाईस ऑफ मिडिया पत्रकार संघाच्या कार्यक्रमाला उपस्थिती.दुपारी १२.१५ वाजता नळदुर्ग येथे आगमन व नळदुर्ग किल्ल्याची पाहणी.दुपारी दुपारी १ ते दुपारी २ वाजतापर्यंत उपजिल्हा रुग्णालय,नळदुर्ग लोकार्पण सोहळा व विविध रुग्णालय ऑनलाइन उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थिती. दुपारी २ वाजता नळदुर्ग येथून शासकीय वाहनाने सोलापूरकडे प्रयाण करतील.

## गितांजली शेळकेंच्या पाणलोट क्षेत्रातील कामाचे कौतूक करावे तेवढे कमीच : आनंदराव अडसूळ

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१८, सुपा (अ.नगर) :** पिंपरी जलसेन मध्ये पाणलोट क्षेत्राचे झालेले काम पाहून जिल्हा बँकेच्या संचालिका गितांजली शेळके यांचे कौतूक करावे , तेवढे कमीच आहे, असे गौरवोद्गार माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री व खा. आनंदराव आडसूळ यांनी काढले आहेत.




यावेळी खा. आडसूळ पुढे म्हणाले की, पिंपरी जलसेन मध्ये पाणलोट क्षेत्राच्या कामाचा संकल्पना मांडली व ती गितांजली यांनी उचलून धरली. त्यामुळे पिंपरी जलसेन ला राज्य शासनाचा राज्य स्तरीय मानाचा दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला, असे ही खा. आडसूळ म्हणाले.

खा. निलेश लंके यांनी गुलाबराव शेळके व संपूर्ण शेळके परिवाराचे कौतूक करून महानगर बँकेच्या वतीने पारनेर करांना मुंबईत आर्थिक ताकद देऊन आधार देण्याचे मोठे काम केल्याने आज खऱ्या अर्थाने पारनेरकर मुंबईत ताठ मानेने उभे आहेत . जलसेन नावातच पाणी असून त्यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने काम करतात. भर उन्हात उभे राहून त्यांनी पाणलोट क्षेत्राचे काम पूर्ण केले. त्याचबरोबर त्यांनी आजू बाजूच्या गावांनाही जोडण्याचे काम केले. यांची जी विकासात्मक कामे अपूर्ण आहेत, ती पूर्ण करून देण्याचाही शब्द खा . लंके यांनी दिला. तर राज्याचे माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे शेळके परिवाराचे योगदानाबद्दल गौरव केला.

प्रास्ताविक करताना जिल्हा सहकारी बँक व महानगर बँकेच्या संचालिका गितांजली शेळके यांनी पिंपरी जलसेन मध्ये पाणलोट क्षेत्राचे उर्वरित काम करताना येणाऱ्या अडचणी व उर्वरित कामांचा ऊहापोह केला. तर या कामामुळे येथील ग्रामस्थ उपजीविकेसाठी बाहेरगावी जात असे, ते थांबले व गावातील आपापल्या शेतातच राबवू लागल्याने शेतातील उत्पन्न वाढू लागले, गाव सुजलाम सुफलाम झाले. काम करताना मदतीचे अनेक हात पुढे आल्याने हे काम करता आले. अजून गावाची वीजेची समस्या कमी करण्यासाठी सोलर च्या माध्यमातून वीजेची समस्या सोडविण्याचा विचार बोलून दाखवला व गावा ला नजीकच्या काळात पाण्याची समस्या राहणार नाही, मुबलक पाणी उपलब्ध होणार आहे, फक्त त्यासाठी पाणी मीटर द्वारे देण्याचा विचार ही गितांजली शेळके यांनी बोलून दाखवला.

यावेळी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, अशोक पवार, अशोक धात्रक, नगरसेवक रविंद्र इथापे, माजी कुलगुरू डॉ एस एन पठाण, महानगर बँकेच्या संचालिका स्मिता शेळके यांनी मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अरुण कडू, सामाजिक कार्यकर्ते माधवराव देशमुख, महानगर बँकेच्या चेअरमन सुमनताई शेळके, व्हाईस चेअरमन भास्करराव कवाद, माजी व्हाईस चेअरमन सिताराम आडसूळ, प्रभाकर कवाद, लक्ष्मण गाजरे, सर्व संचालक, कर्मचारी, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, मुंबई महानगर पालिकेच्या शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी किसनराव पावडे सर, ज्ञानदेव लंके, उद्योजक मच्छिंद्र लंके, भानुदास खोसे, वसंतराव कवाद, प्राचार्य सहदेव आहेर, भाऊसाहेब आहेर, सुभाष बेलोटे, ठकाराम लंके, शिवाजीराव जाधव, शिवाजीराव औटी, विनोद फापाळे, सुभाष साठे, वसंतराव वांढेकर व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पिंपरी जलसेन चे माजी सरपंच लहू थोरात यांनी आभार मानले.

## जिल्हा परिषदेमार्फत जिल्हास्तरीय पशुपक्षी प्रदर्शनाचे आयोजन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, भिवंडी (ठाणे) :** शेतकरी व पशुपालक यांनी प्रेरणा घेऊन पशुपालन उद्योग, शेती व्यवसायाबरोबरच शेतकऱ्यांचे उत्पन्नात वाढ होण्यासाठी व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी जिल्हा परिषद ठाणे पशुसंवर्धन विभाग अंतर्गत 'जिल्हास्तरीय पशुपक्षी प्रदर्शन' शुक्रवार दि.२१ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९ वा. आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण, बापगाव, भिवंडी येथे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

ठाणे जिल्ह्यातील पशुपालकांनी जिल्हास्तरीय पशुपक्षी प्रदर्शनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक रोहन घुगे यांनी केले आहे.

या प्रदर्शनासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, प्रादेशिक सहायुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रशांत कांबळे, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. वल्लभ जोशी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय पशुपक्षी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत आहे. लोकसभा सदस्य डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे, लोकसभा सदस्य बाळ्यामामा-सुरेश गोपीनाथ म्हात्रे, लोकसभा सदस्य नरेश गणपत म्हस्के, विधानसभा सदस्य ज्ञानेश्वर बारकू म्हात्रे, विधानसभा सदस्य रविंद्र दत्तात्रय चव्हाण, विधानसभा सदस्य दौलत भिका दरोडा, विधानसभा सदस्य संजय मुकुंद केळकर, विधानसभा सदस्य कुमार उत्तमचंद आयलानी, विधानसभा सदस्य महेश प्रभाकर चौगुले, विधानसभा सदस्य विश्वनाथ आत्माराम भोईर, विधानसभा सदस्य राजेश गोवर्धन मोरे, विधानसभा सदस्य निरंजन वसंत डावखरे, विधानसभा सदस्य डॉ. जितेंद्र सतिश आव्हाड, विधानसभा सदस्य किसान शंकर कथोरे, विधानसभा सदस्य मंदा विजय म्हात्रे, विधानसभा सदस्य डॉ. बालाजी प्रल्हाद किणीकर, विधानसभा सदस्य शांताराम तुकाराम मोरे, विधानसभा सदस्य नरेंद्र मेहता, विधानसभा सदस्य रईस कासम शेख, विधानसभा सदस्य सुलभा गणपत गायकवाड आदि मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदर्शन संपन्न होणार आहे.

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे काळाची गरज- आ.कैलास पाटील

**अक्षराज : आश्रुबा कोठावळे**

**दि.१८, कळंब (धाराशिव) :** कळंब तालुक्यातील भोगजी येथील कै पवनराजे निंबाळकर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व सार्वजनिक व्यक्तिमत्व विकास ला चालना देण्यासाठी विविध गुणदर्शन सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटक कळंब धाराशिव विधानसभेचे आमदार कैलास पाटील यांच्या शुभहस्ते ग्रामदैवत पद्मावती देवीच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष माजी सरपंच वसंत आबा खराटे होते.या कार्यक्रमांमध्ये आमदार कैलास पाटील यांनी विद्यार्थ्यांचा गुणगौरव केला व ग्रामीण भागामध्ये इंग्रजी व सेमी इंग्रजी च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत विद्यार्थतच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रम राबवित असलेबाबत संस्थेचे अध्यक्ष सचिव यांचे अभिनंदन करून सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद धाराशिव चे उपशिक्षणाधिकारी दत्तात्रय लांडगे, शिक्षण विस्तार अधिकारी बालाजी यरमूनवाड, माळी संतोष, गुरव साहेब, डिकसळ चे माजी उपसरपंच सचिन काळे, शिवसेना शहर प्रमुख विश्वजीत जाधव, पत्रकार बालाजी अडसूळ, मुख्याध्यापक परमेश्वर पालकर,



मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, महादेव खराटे, सुनील लुगडे, बालासाहेब चौधरी, दिगंबर डाके, पिंपळगाव को चे सरपंच ज्ञानेश्वर तांबडे, बहुला गावच्या सरपंच आशाताई आश्रुबा बिक्कड, भोगजी सरपंच मंगल श्रीपती, अडसूळवाडीचे सरपंच लंकाबाई सर्जेराव, अडसूळ शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रामदास चौधरी, उपस्थित होते.

कार्यक्रमांमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन, शेतकरी गीत, देशभक्तीपर गीत अशा विविध कार्यक्रमांची रेलचेल झाली .कार्यक्रमासाठी पालक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक रमेश पालकर, स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक रामहरी खराटे व दोन्ही शाळेचे सर्व शिक्षक वृंद कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्थेचे सचिव दादासाहेब खराटे यांनी केले कार्यक्रमाच्या प्रस्ताविकामध्ये दादासाहेब खराटे यांनी शाळा स्थापनेपासून शाळेचा इतिहास विद्यार्थ्यांनी केलेले विविध क्षेत्रातील कामगिरी शाळेची गुणवत्ता याबाबत सविस्तर माहिती दिली . सूत्रसंचालन अशोक बिक्कड, आवाड मॅडम, स्नेहल खराटे, सुरवसे मॅडम यांनी केले. तर वेशभूषा पालकर मॅडम, पंडित मॅडम यांनी तर आभार बाळासाहेब देवकते यांनी मानले.

## शेतकऱ्यांना शेत पाणंद रस्ता सुरळीत असने आवश्यक...

**अक्षराज : राजू गागरे**

**दि.१८, झरी (यवतमाळ) :** तालुक्यातील बहुतांश शेतकर्यांच्या शेतात ये जा साठी पाणंद रस्ते सुरळीत असने आवश्यक आहे. तालुक्यातील अनेक गावच्या शेतकरी बांधवांना शेतात खते, बी बीयाने, शेती पूरक अवजारे ने आण करताना रस्त्यांच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. पावसाच्या दिवसात शेत पाणंद रस्ते चिखलमय खराब अवस्थेत निदर्शनास येते. मात्र शेत पाणंद रस्त्यांच्या योजनेबद्दल काहींना पुरेपूर माहिती नसल्याने मातोश्री ग्राम समृद्धी शेत पाणंद रस्त्याच्या योजनेपासून अनेक जण वंचितच आहे. शेत पाणंद रस्ते म्हणजे सर्व शेतकऱ्यांच्या संमतीने आपापल्या शिवारातून शेतमालाची किंवा शेती अवजारांची ने आण करण्याकरिता निर्माण केलेले कच्चे रस्ते होय. शेतीसाठी लागणाऱ्या जमिनीपर्यंत पोहोचण्यासाठी बांधलेले रस्ते, ज्यांना 'पांदण' किंवा 'शेत पाणंद रस्ता' असंही म्हणतात. परंतु काही जणांना शेत रस्ते योजना बाबत पुरेपूर माहिती नसल्याने शासनाच्या योजनेपासून वंचित राहीले आहे. काही शेतकरी वर्गाची संबंधित कार्यालयात मागणी असतांना पाणंद रस्त्यांच्या योजने पासून वंचित आहे. तर काही ठिकाणी पाणंद रस्ते योजनेतून कच्चा रस्ता केला गेला.मात्र आज दयनीय अवस्थेत आहे. महाराष्ट्र सरकारने या रस्त्यांसाठी 'मातोश्री ग्राम समृद्धी शेत पाणंद रस्ते या नावाने




योजना' या पुर्वी २०२२ मध्ये सुरू केली आहे, ज्यामुळे शेतकरी बांधवांना शेतात रहदारीस सोयीस्कर रस्त्याचा लाभ घेता येईल. मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेच्या माध्यमातून. शेतकरी बांधवांना शेतीसाठी सोयीस्कर रस्ते उपलब्ध करण्याचा राज्य शासनाचा उद्देश होय. या योजनेची अंमलबजावणी ही मनरेगा आणि राज्य रोहयो यांच्या माध्यमातून राबविण्यात येते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्या शेतकर्यांचा शेतात जाण्यासाठी योग्य रस्ता नाही, अशा सर्व शेत-जमिनी मालकांना या योजनेचा लाभ घेता येतो. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १४३ अन्वये शेत रस्ता मिळवण्या करीता मागणी करता येते. शेत पाणंद रस्त्याच्या योजनेकरीता तहसीलदार कार्यालयात अर्ज करावा लागतो. यासाठी लागणारी कागदपत्रे जमिनीचा नकाशा, सातबारा आणि इतर आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडावी लागतात. मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजना शेतकऱ्यांसाठी खूपच उपयुक्त आहे, ज्यामुळे त्यांना शेतीसाठी सोयीस्कर रस्त्याचा लाभ घेता येईल. या योजनेमुळे लाभार्थी शेतकरी बांधवांची माल वाहतूक सोयीची होईल. म्हणून राज्य शासनाच्या वतीने मातोश्री ग्रामसमृध्दी शेत पाणंद रस्ते योजना सन २०२२-२३ वर्षी सुरू करण्यात आली आहे.

आजही तालुक्यातील अनेक शेतकरी पाणंद रस्ते दुरुस्ती अभावी त्रस्त आहेत. परिणामी, पदरमोड करून आर्थिकदृष्ट्या खालावलेल्या, मात्र मनाची श्रीमंती असलेल्या शेतकऱ्यांना लोकवर्गणीतून पाणंद रस्त्याची दुरुस्ती करण्याची वेळ आली आहे. शेताच्या रस्त्या अभावी निर्माण होणाऱ्या गंभीर समस्यांना आणि भांडणाच्या प्रकरणांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे येथील अनेक शेतकरयांना शेत पाणंद रस्ता सुरळीत असने आवश्यक झाले आहे.

## दस्तुरी नाका लुटमारीमुळे माथेरान नाव होते बदनाम...

### माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समिती स्थापन

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१८, माथेरान :** माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समिती समितीच्या वतीने आज माथेरान मध्ये येणाऱ्या पर्यटकांची होणारि फसवणूक या विषयावर पर्यटन बचाव संघर्ष करण्यासाठी आज मधुमालती हॉटेल येथे मीटिंग घेण्यात आली, मध्ये कुलदीप जाधव , रत्नदीप प्रधान मनोज खेडकर शिवाजी शिंदे शकील पटेल योगेश जाधव चंद्रकांत जाधव जनार्दन पार्ट, गिरीश पवार अनंत शेलार प्रदीप घावरे ,सुहासिनी शिंदे, जयश्री कदम निखिल शिंदे, दीपक शहा, नितीन शहा, हेमंत पवार नितेश कदम आदी नागरिक महिला मोठया संख्येने उपस्थित होते.



नेरळ माथेरान घाट सुरू होतो तिथून ते दस्तुरी नाका हे माथेरान मुख्य प्रवेशद्वार असल्याने येणारे पर्यटक नागरिक ह्याच मार्गाने माथेरन मध्ये ये जा करीत असतात. परंतु कोरोना काळानंतर नेरळ माथेरान घाटात सुरवातीलाच पर्यटकांच्या प्रायव्हेट गाड्या अडवणूक करूण त्यांच्याकडून पाचशे रुपयाची पावती फाडली जाते. तर अनेक वर्ष दस्तुरी नाका येथे माथेरान, व माथेरान पर्यटनाशी काहीही घेणे देणे नसलेल्याकडून पर्यटकांची दिशा भूल करून राजरोसपने लुटमार चालू आहे.

पर्यटकांची आलेल्या गाडीमागे धावणे, प्रवेश पावतीसाठी पर्यटकाना न पाठवता स्वतः काढून आणणे त्यांना मेन प्रवेशद्वारातून न नेता दुसऱ्या रस्त्याने घेऊन जाणे, अश्या गोष्टीकडे स्थानिक प्रशासन कुठलेही नियोजन नसल्याने माथेरान पोलीस प्रशासन, माथेरान नगरपालिका, वन विभागाणे माथेरान पार्किंग झोन मध्ये या सर्वांना प्रवेश बंदी करावी अशी स्थानिकांची मागणी आहे. मागील काही दिवसांपासून तर पर्यटकांना लुटमारीचा भयंकर प्रकार राजरोजपणे दिवसा गणित वाढत चालला आहे असल्याने माथेरानला गेल्या काही महिन्यातच एक पर्यटकांना दस्तूरी कार पार्किंग येथे आलेल्या अनुभवाचा त्यांनी youtube द्वारे सोशल मीडियावर माथेरानला जाताना घोडेवाल्यांपासून सावधान सोशल मीडियावर टाकलेली क्लिप चांगलीच गाजत आहे. त्यामुळे माथेरान पर्यटनावर त्याचा फार मोठा फटका बसत आहे. स्थानिक प्रशासनाकडे येथे सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पार्टी यांनी लेखी स्वरूपात अनेक डिपार्टमेंटकडे याबाबत लेखी पत्र द्वारे निवेदन दिलेली आहेत. परंतु दस्तुरी नाक्यावर लुटमार्ग केंद्र मात्र राजरोजपणे आजही सुरू आहे. त्या अनुषंगानेच आज माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समितीची प्राथमिक बैठक हॉटेल हॉटेल मधुमालती येथे संपन्न झाली. यामध्ये येणाऱ्या पर्यटकांची होणारी फसवणूक विषयावर पर्यटन बचाव संघर्ष करण्याची वेळ आली आहे. माथेरानला येणाऱ्या पर्यटकांची होणारी फसवणूक ही थांबली नाही तर माथेरानचे भवितव्य अंधारमय झाल्याशिवाय राहणार नाही, अशी खंत उपस्थित नागरिक महिलांनी यावेळी आपल्या मत व्यक्त करताना केले. हा लढा कोणत्याही नागरिक व्यवसाय विरुद्ध नसल्याने, पर्यटकांची होणारी फसवणूक एका मुद्द्यावरच हा लढा उभारण्यात येणार आहे. दस्तुरी नाका येथील संबंधित शासनाला जागे करण्याचे प्राथमिक काम हाती घेऊन पुढील काळात आंदोलनाची दिशा ठरविण्यात येईल.

